# पायावर सूज



ह : हमखास क : कधीकधी
ब : बहुधा उ : उशीरा

आजार: साधा आजार, मध्यम आजार, गंभीर आजार

| एका पायावर सूज | दोन्ही पायांवर सूज | बोटाने दाबल्यावर खड्डा पडणे | दुखरेपणा | अवधाण किंवा ओळंबा | दम लागणे | निस्तेजपणा (फिकट) | छातीत धडधड | जलोदर | खाज सुटणे | ताप | विशेष बाबी | आजार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ह | ह | | | ह | ह | ह | उ | | | रक्तद्रव्याचे प्रमाण कमी | रक्त पांढरी, कुपोषण |
| | ह | ह | | | ह | | ब | ब | | | झडपांचे दोषपूर्ण आवाज, जुनाट दम्यानेही हृदय कमकुवत होते. | हृदयविकार (झडपांचे आजार) |
| | ह | ह | | | | | | | | | चेहऱ्यावर सकाळी सूज चढते, लघवी/रक्त तपासणी आवश्यक | मुत्रपिंडाचे आजार |
| | ह | ह | | | ब | ब | क | | | | बहुधा दुसऱ्या–तिसऱ्या तिमाहीत होणारा त्रास. लघवीत प्रथिने, रक्तदाब वाढतो | गर्भार सूजेचा आजार |
| | ह | ह | | | | | | | | | बहुधा कुटुंबात/शेजारी अनेकांना एकदम त्रास | अन्नभेसळीचा एक प्रकार |
| ब | क | ह | | ह | | | | | | ब | थंडीताप येतो, मग अवधाण येते. रात्रीचा रक्त नमुना तपासणे आवश्यक | हत्तीरोग (प्रथमावस्था) |
| ब | क | | | ह | | | | | | | पूर्वीची सूज निबर होत जाते | हत्तीरोग (उशिराची अवस्था) |
| ब | क | ब | ह | | | | | | ब | ब | दुषित भाग दुखरा, गरम लागतो. | जंतुदोष (दाह), चिखल्या |
| ह | | ब | ह | | | | | | | क उ | सर्पविषाच्या इतर खाणाखुणा (रक्त किंवा मज्जासंस्थेवर) | सर्पदंश |
| ह | | क | ह | | | | | | | क | संबंधित सांध्यांची हालचाल आखडते (पूर्वेतिहास पहा) वारंवार होणारा आजार. सांधेसूज | सांधेदाह – सांधेसूज (मुरगळणे) |
| ह | | क | ह | क | | | | | ब | ब | बहुधा दीर्घकाळ चालणारा आजार, कर्करोग किंवा जंतुदोष यामुळे सूज, कर्करोगाची सूज कठीण लागते. | हाडसूज किंवा हाडाचा कॅन्सर |
| ब | | क | ह | ह | | | | | | उ | संबंधित भागावरील नीला सूजलेल्या दिसतात | रक्तप्रवाहात गाठी होणे /अडथळा |
| ब | क | | | | | | | | | | बहुधा पोटातील गाठ तपासतांना हाताला लागते | पोटातील गाठीमुळे रक्तप्रवाहास अडथळा |
| ब | क | | | | | | | | ह | | त्वचेवर अनेक ठिकाणी बारीक भोके त्याच्यातून पाणी येते | बुरशी दोष |